# नियमीत दिवाणी दावा क्र.४४/२००५
## श्रीमती वेलकी धोडी वि. जिल्हा परिषद, ठाणे व इतर
## आदेश निशाणी क्र.९५ आदेश

(दिनांक १४/०२/२०२४)

---

०१. वादीने हा अर्ज नि.क्र.७६ वरील अर्जामधील आदेशाप्रमाणे फेरमोजणीसाठी दिलेला आहे.

०२. वादींचे असे कथन आहे की, नि.क्र.७६ वरील आदेशाप्रमाणे ती मोजणी झालेली नाही आणि म्हणून त्यांना पटलावरील मोजणी नकाशा व अहवाल मान्य नाही.

०२. या अर्जास उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, तलासरी यांचे म्हणणे मागविण्याचा आदेश झाला होता. त्या आदेशाप्रमाणे उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, तलासरी यांनी नि.क्र.९८ वर म्हणणे दाखल केले. त्यानंतर म्हणणे नि.क्र.९८ मधील परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद असलेल्या तुकडे बंदी कायदयाच्या प्रक्रियेबाबत व नकाशाबाबत वादीने शपथपत्र दाखल करावे असा आदेश या अर्जावर झाला. त्याप्रमाणे वादी क्र.५ वेस्ता याने शपथपत्र क्र.९९ दाखल केले व न्यायालयास कळविले की, त्याचे माहितीप्रमाणे महाराष्ट्र धारण जमीनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करणेबाबत अधिनियम १९४७ च्या तरतूदीनुसार मौजे वसा गावाच्या जमीनीबाबत आजपर्यंत एकत्रीकरण योजना अंमलात आणली नाही.

०३. म्हणजेच उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय तलासरी यांनी दिलेले म्हणणे नि.क्र.९८ आणि वादीने दिलेले शपथपत्र नि.क्र.९९ यामध्ये जमीन एकत्रीकरण योजना मौजे वसा गावामध्ये अस्तीत्वात आहे किंवा नाही याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होतो. त्यामुळे हा अर्ज आणि दावा गुणदोषावर निकाली काढण्यासाठी उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, तलासरी यांचे आणि प्रतिवादी क्र. १ जिल्हाधिकारी ठाणे(सध्या जिल्हा पालघर) यांचे मौजे वसा गावात एकत्रीकरण योजना अंमलात आणली गेली किंवा नाही या तथ्या बाबत संबंधीतांनी शपथपत्रावर म्हणणे मागविणे गरजेचे वाटते. येणे प्रमाणे मी खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. मौजे वसा, ता. तलासरी या गावात एकत्रीकरण योजना राबविली किंवा कसे याबाबत जिल्हाधिकारी पालघर व

उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय तलासरी यांनी शपथपत्रावर म्हणणे दयावे.

२. संबंधीतांना याबाबत पत्र पाठवावे.

३. तो पर्यत हा अर्ज प्रलंबित ठेवण्यात येतो.

सही/–

**(सतीश या. कदम)**

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ.स्तर,

पालघर.

दिनांक : १४/०२/२०२४

ठिकाण : पालघर.